## तालुका प्लास्टीक कचरा व्यवस्थापन युनिट (PWMU) चालविणे (MRF-Material Recovery Facility) साठी नेमणुक

स्वच्छ भारत मिशन टप्पा 2 जिल्हा परिषद यवतमाळ अंतर्गत १६ तालुकास्तर / ग्रामपंचायत प्लास्टिक कचरा व्यवस्थापन कक्ष कार्यान्वित ठेवण्यासाठी व जिल्हयातील १७८९ गावातुन कचरा संकलन करुन सदर कच-यावर प्रकिया करणेसाठी Material Recovery Facility संस्थेची किमान 3 वर्ष कालावधीसाठी नेमणुक होण्याकरीता इच्छुक व पात्र संस्था /कंपनी कडुन प्रस्ताव मागविण्यात येत आहेत. संस्था/ कंपनी निवड होण्यासाठी कामकाजासंबंधी माहिती व संस्था /कंपनी अर्हता व पात्रता प्रस्तावासोबत अत्यावश्यक कागदपत्र, नेमणुकीबाबतचे अटी शर्ती https://zpyavatmal.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर देण्यात आलेले आहे. सदर प्रकल्पासुन संस्थेला मिळणा-या उत्पनातुन रु 0 पासुन पुढे किती रुपयांपर्यत मोबदला ग्रामपंचायतीला देणार आहे तसे दरपत्रकात नमुद करुन व अटी शर्ती पाहुन आवश्यक कागदपत्रे व दरपत्रक दि. 10/2/2023 सायं ४ वाजे पर्यत जिल्हा पाणी व स्वच्छता विभाग जिल्हा परिषद यवतमाळ येथे जमा करावे.

उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पा व स्व)
जिल्हा परिषद यवतमाळ

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद यवतमाळ

# कामाचे स्वरुप तसेच अटी व शर्ती

**कामाचे स्वरुप:-**

यवतमाळ जिल्हयातील 16 तालुकास्तरीय प्लास्टिक कचरा व्यवस्थापन कक्ष प्रकल्प चालविणे, सर्व प्रकल्पाची देखभाल दुरुस्ती तालुक्यातील प्रत्येक गावातुन (जिल्हयातील एकुण 1789 गावे ) कोणताही मोबदला न घेता सुका कचरा संकलीत करणे, गोळा झालेले प्लॉस्टिक वेस्ट वर उपरोक्त मशीन द्वारे प्रक्रिया केलेले (स्वच्छ करणे,तुकडे करणे व बंडल तयार करणे) प्लॉस्टिक MPCB कडुन मान्यता प्राप्त पुर्नचक्रीकरण संस्था कडे वर्ग करणे यासाठी मटेरियल रिसायकलिंग सुविधा किंवा साहित्य पुर्नप्राप्ती सुविधा किंवा मल्टीरियुज सुविधा म्हणुन काम करणे, व या बाबत गाव निहाय गोळा केलेल्या कचऱ्याचे वजन किलो सह तसेच प्लास्टीक व्यवस्थापन कक्षात प्रक्रिया केलेले प्लास्टीक कचरा पुर्नचक्रिकरण संस्था किंवा कंपनी कडे वर्ग केलेले वजन कि.लो सह मासिक अहवाल संबंधित गट विकास अधिकारी पंचायत समिती यांना देण सदर प्रक्रिया साठी on line सॉफटवेअर तयार करुन गावनिहाय अहवाल निर्माण करणे. इ.

<u>अटी शर्ती</u>

1) एका व्यावसायिक संस्था/ स्वयंसेवी संस्था/ कंपनी धारकास केवळ एकच निविदा भरता येईल.

2) शासनाचे मुंबई दुकाने व संस्था अधिनियम 1948 नुसार नोंदणी प्रमाणपत्र (shop Act Licence)

3) 3 वर्ष आयकर रिटर्न पुरावा तसेच GST प्रमाणपत्र छायांकित प्रत

4) संस्था किंवा कंपनी आर्थीक क्षमता प्रमाणपत्र – कपंनीचे मागील तिन आर्थीक वर्षाचे किमान 1 कोटी पेक्षा जास्त उलाढाल असणे आवश्यक (CA प्रमाणपत्र)

5)प्लॉस्टिक पुर्नचक्रिकरणाशी सलग्न कामे किमान 3 वर्ष केले असल्याचा अनुभव प्रमाणपत्र

6) प्रस्ताव सादर करणारी संस्था किंवा कंपनी ही अधिकृत प्लास्टिक पुर्नप्रक्रिया (Recycle) असल्याचे MPCB कडील प्रमाणपत्र असणे अनिवार्य असेल. किंवा प्रस्तावित MRF-Material Recover facility संस्था /कंपनी यांचे MPCB ने मान्यता दिलेल्या किमान 3 अधिकृत प्लास्टीक पुर्नप्रक्रिया कंपनी सोबत असलेले कराराची प्रत सोबत जोडणे आवश्यक असेल.

7) निवड केलेल्या संस्थेचा किंवा कंपनीचा जिल्हा परिषद ,यवतमाळ मार्फत जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत स्तरावर उपरोक्त कामासाठी 3 वर्षाच्या कालावधीसाठी करार करण्यात येईल. सदर काम समाधान कारक असल्यास पुढील 2 वर्षाच्या कालावधी वाढविण्याचे अधिकारी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यवतमाळ यांचे असेल

8) निवड करण्यात आलेल्या संस्था किंवा कंपनी यांनी प्रत्येक तालुकास्तरीय प्लास्टिक कचरा व्यवस्थापन कक्ष याची वरील कालावधीसाठी नियमित देखभाल दुरुस्ती व आवश्यक असलेले मनुष्यबळ पुरविणे व त्यांना मजुरी प्रदान करणे,सदर प्रकल्पाचे विज व पाणी बिल अदा करणे इ. साठीचा लागणारा खर्च स्वता: करणे बंधनकारक असेल.

9) निवड करण्यात आलेल्या संस्था किंवा कंपनी यांनी प्रत्येक ग्रामपंचायत हददी मधील कचरा संकलन केंद्र येथुन संकलित कचऱ्याची वाहतुक स्वखर्चाने करावयाची आहे. त्यासाठी ग्रामंपयायत पंचायत समिती व जिल्हा परिषद यवतमाळ यांचे द्वारे कोणताही खर्च अथवा साधन सामुग्री उपलब्ध करुन देण्यात येणार नाही.

10)निवड करण्यात आलेल्या संस्था किंवा कंपनी यांनी तालुकानिहाय व गावनिहाय प्लास्टिक कचरा संकलानाचे नियोजन करुन प्रत्येक गावांचे नियमित सुका कचरा संकलीत करणे बंधनकारक असेल.

24)इच्छुक संस्था/कंपनी यांनी बंद लिफाफा मध्ये नमुद केलेल्या सर्व कागदपत्रासह प्रस्ताव या कार्यालयास दि.10-2-**2023 संध्याकाळी 4.00 पर्यंत देण्यात यावे.** सदर वेळेनंतर प्राप्त प्रस्ताव विचारात घेतल्या जाणार नाही याची नोंद घ्यावी.

25)इच्छुक असलेल्या संस्था/ कंपनी कडुन प्राप्त प्रस्ताव पुर्ण पणे किंवा अंशता: स्विकारणे अथवा नाकारण्याचे संपुर्ण अधिकारी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जि. प यवतमाळ यांनी राखुन ठेवले आहे.

उपरोक्त अटी शर्ती नुसार प्लास्टीक व्यवस्थापन चे आराखडे (DPR) व अंदाजपत्रके (Estimate) विनामुल्य करुन प्लास्टिक व्यवस्थापन प्रकल्प चालविण्याकरीता संस्था/ कंपनी यांची नियुक्ती करावयाची आहे, त्याकरीता जाहिरात देवुन अटी शर्ती जिल्हयाच्या संकेत स्थळावर उपलोड करण्यात आलेले आहे.